# महिला शेतकरी मेळावा व आरोग्य तपासणी शिबिर पोखर्णी येथे उत्साहात संपन्न

कृषी विज्ञान केंद्र, पोखर्णी येथे 'महिला शेतकरी शास्त्रज्ञ संवाद' आणि 'आरोग्य पोषण जनजागृती' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या निमित्ताने महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर, हळदी-कुंकू समारंभ आणि विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान के.व्ही.के. पोखर्णीचे संचालक डॉ. एस. डी. मोरे यांनी भूषविले. प्रमुख पाहुण्या म्हणून स्त्रीरोग व वंध्यत्व निवारण तज्ञ डॉ. रूपाली कोकडवार (तुळजाई वूमन अँड चाईल्ड क्लिनिक) हया उपस्थित होत्या. तसेच मंचावर डॉ. देविकांत देशमुख (वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख), प्रा. माणिक कल्याणकर (पीक संरक्षण तज्ञ), प्रा. सौ. अलका पवळे (गृह विज्ञान तज्ञ ) व महिला प्रतिनिधी म्हूणन कृषि सखी सौं. शीतल पिंपळपल्ले यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात कृषी अनुसंधान परिषद गीताने करण्यात आली.मान्यवरांचे हस्ते बळीराजा व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले.त्यानंतर मान्यवरांचे स्वागत, शाल व पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी सौं. शोभाताई विठ्ठलराव जाधव अध्यक्ष, जे.एन.एस.टी.आर.ट्रस्ट,नांदेड यांनी दिलेला संदेश,उपस्थित महिलांनासमोर प्रा.अलका पवळे (गृह विज्ञान केंद्र) सादर केला ज्यात त्यांनी आजचा कार्यक्रम केवळ उत्सव साजरा करण्यासाठी नाही, तर कृषि विज्ञान केंद्रा पोखर्णीच्या माध्यमातून महिला शेतकऱ्यांना वेळोवेळी कृषी क्षेत्रातील विविध समस्यांवर उपाय उपलब्ध करून देण्यासाठी आहे.आजची महिला ही केवळ गृहिणी नाही तर शेतीचा खरा कणा आहे. पेरणीपासून ते कापणीपर्यंत, जनावरांची काळजी घेणे, शेतीसोबतच घर आणि कुटुंब सांभाळणे, बचत गट, महिला सर्व जबाबदाऱ्या कुशलतेने पार पाडत आहेत. यासाठी, मी महिलांना या कार्यक्रमाच्या निमित्ताने आपल्या जवाहरलाल नेहरू शिक्षण संस्था विज्ञान आणि तंत्रज्ञान संशोधन संस्थेच्या कृषि विज्ञान केंद्राच्या शास्त्रज्ञांकडून नवीन कृषी योजना व तंत्रज्ञान, विविध प्रक्रिया उद्योग, सरकारी योजना, शेतीशी संबंधित महिलांसाठी व्यवसाय आणि सेंद्रिय शेती याबद्दल माहिती मिळावी असे आवाहन केले. यांनंतर त्यांनी  सर्व उपस्थित महिलांचे व सहकार्य करणाऱ्यांचे आभार मानले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना डॉ. देविकांत देशमुख यांनी महिला शेतकऱ्यांच्या कृषि क्षेत्रातील योगदानावर प्रकाश टाकला. त्यांनी सांगितले की, महिलांनी शेतीसोबतच स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष देणे काळाची गरज आहे. आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन महिला शेतकरी आपली आर्थिक प्रगती साधू शकतात, असेही त्यांनी नमूद केले. प्रमुख पाहुण्या डॉ. रूपाली कोकडवार यांनी उपस्थित महिलांना आरोग्य, पोषण आणि स्वच्छता या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. प्रसूतीशास्त्र आणि स्त्री आरोग्याशी संबंधित समस्यांवर त्यांनी संवाद साधला. या प्रसंगी आयोजित आरोग्य शिबिरात अनेक महिलांची मोफत तपासणी करण्यात आली. महिला सक्षमीकरण आणि सामाजिक जनजागृतीच्या उद्देशाने आयोजित महिला मेळाव्याचे प्रभावी सूत्रसंचालन डॉ. अमिता क्षत्रिय यांनी केले त्यांनी स्त्री शक्तीचा गौरव करत कार्यक्रमाची मांडणी केली. कार्यक्रमाच्या उत्तरार्धात महिलांसाठी हळदी-कुंकू कार्यक्रम व विविध मनोरंजक स्पर्धा घेण्यात आल्या, ज्यामध्ये महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला व त्यासाठी प्रथम, द्वितीय व तृतीय असे बक्षीस ही देण्यात आले.

सदर कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजन प्रा. सौ. अलका पवळे (गृह विज्ञान तज्ज्ञ )आणि डॉ. सौ.अमिता क्षत्रिय (कृषी विस्तार तज्ज्ञ) यांनी केले व पशुवैद्यक तज्ज्ञ डॉ. महेश अंबोरे यांचे या कार्यक्रमासाठी विशेष सहकार्य लाभले. या कार्यक्रमाच्या सांगतेवेळी प्रा. सौ.अलका पवळे यांनी मेळाव्याच्या यशस्वीतेबद्दल आनंद व्यक्त केला. त्या म्हणाल्या, "महिलांच्या एकजुटीमुळेच हा सोहळा यशस्वी होऊ शकला. निमंत्रणाचा स्वीकार करून मोठ्या संख्येने उपस्थित राहिलेल्या सर्व भगिनींचे त्यांनी मनापासून आभार मानले." तसेच त्यांनी कार्यक्रमाला प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मदत करणाऱ्या सर्वांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.कृषि विज्ञान केंद्र, पोखर्णी चे कर्मचारी श्री ए.जी भालेराव,श्री आर आर इंगोले,श्री एस.एस.जाधव, श्री आर.टी. वाडीले,सौ पी. एस. हाडोळतिकर, श्री एस.एस. गायकवाड, श्री एस.आर.कोणापुरे, श्री.दत्ता कदम श्री आर.जी.राऊत आणि संतोष वाघमारे यांचे विशेष सहकार्य लाभले. तळणी, पोखर्णी, ढोकी, लिंबगाव, शहापूर, पांगरी या विविध गावातील १५२ महिला शेतकरी या कार्यक्रमा साठी उपस्थित होत्या.राष्ट्रगीताने या कार्यक्रमाची अधिकृत सांगता झाली.









कृषि विज्ञान केंद्र, पोखर्णी ता.जि.नांदेड
महिला शेतकरी मेळावा
दिनांक :




महिला शेतकरी मेळावा








